REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X

VOLUME - 8 | ISSUE - 4 | JANUARY - 2019

# कादंबरी व कादंबरीसमीक्षेतील अनुबंध

**प्रा. डॉ. भास्कर निफाडे**
**पदव्युत्तर अध्ययन व संशोधन केंद्र, रा.ब.नारायणराव बोरावके महाविद्यालय, श्रीरामपूर, जि.अहमदनगर.**


## सारांश :

आधुनिक मराठी साहित्यप्रकारांच्या उगमामागे वसाहतवादी समाजरचना कारणीभूत आहे. १८ व्या शतकात पाश्चात्य देशात अनेक साहित्यप्रकारांच्या उगमामागे वसाहतवादी समाजरचना कारण होती. या समाजरचनेतून मध्यमवर्गीयांचा उदय झाला. मध्यमवर्गीयांच्या अभिरुचीतून कादंबरीसारखा वाङ्मयप्रकार उदयास आला. नेमके हेच मराठी कादंबरीच्या उगमाबाबतही झाले. १९ व्या शतकात भारतात नवशिक्षित मध्यमवर्गीय पांढरपेशा समाजाचा उदय झाला. पारंपरिक संस्कृत व अपारंपरिक इंग्रजी यांच्या परिचयातून नवशिक्षित प्रभावित झाले. सुरुवातीला नव्या खाणीचा शोध लागल्याप्रमाणे भाषांतरित साहित्याची भरभराट झाली. यातूनच नवनव्या पाश्चात्य वाङ्मयप्रकारांचा परिचय झाला. 'कादंबरी'सारख्या वाङ्मयप्रकाराचा परिचयही मराठीत याच काळात झाला.

नव्या शिकलेल्या विद्वानांकडून समाज, संस्कृती आणि साहित्य यांची चिकित्साही होऊ लागली. यातून निबंधासारख्या वाङ्मयप्रकाराचा उगम झाला. नियतकालिकातून अनेक विचार मांडले जाऊ लागले. अनेक ग्रंथांची परिक्षणे नियतकालिकांतून केली जाऊ लागली. भाषांतरयुगात जे अनेक ग्रंथ लिहिले गेले अथवा ज्या पुस्तकांची अनेक परीक्षणे केली गेली त्यामध्ये 'कादंबरी या वाङ्मयप्रकारात येऊ घातलेल्या पुस्तकांची परीक्षणेही लिहिली जाऊ लागली. यातूनच आधुनिक मराठी वाङ्मयात कादंबरीची समीक्षा सुरु झालेली दिसते. मराठी कादंबरी आणि तिची समीक्षा यांचा अन्योन्य संबंध अगदी प्रारंभापासूनच आहे. प्रस्तुत घटकामध्ये कादंबरी आणि तिची समीक्षा यातील अनुबंध शोधण्याचा प्रयत्न केला आहे. अनुबंध म्हणजे परस्परसंबंध, लागाबांधा, नाते, अन्वय अथवा जन्मगाठ असे अनेक अर्थ सांगता येतील. मराठी कादंबरी आणि तिची समीक्षा यांची जन्मगाठ प्रारंभीपासूनच दिसते. कोणत्याही कलेचा तत्कालीन युगप्रवृत्तींशी, जीवनधारणांशी, मूल्यव्यवहारांशी निकटचा व दृढ अनुबंध असतो. हाच अनुबंध मराठी कादंबरी आणि तिची समीक्षा यामध्ये आहे. कादंबरीच्या जन्मापासूनच निकटच्या काळातच तिची समीक्षा झालेली दिसते.

## समीक्षा म्हणजे काय ?

समीक्षा म्हणजे एखाद्या वाङ्मयकृतीच्या आस्वादानंतर केलेले तिचे विश्लेषण, अर्थनिर्णयन आणि मूल्यमापन होय. या तीनही कृतींचा समीक्षेमध्ये समावेश होतो. तरीही समीक्षा हा व्यवहार अत्यंत गुंतागुंतीचा आणि व्यामिश्र आहे. तिच्यामध्ये अनेक गुणदोष टीकाटिप्पणी, क्रिया-प्रतिक्रिया यांचा समावेश होतो. समीक्षेविषयी गो. म. कुलकर्णी म्हणतात, - 'आकलन, आस्वादन, विश्लेषण, संश्लेषण, मूल्यमापन, चर्चा, चिकित्सा, तुलना, न्यायदान, गुणदोषदर्शन, विशदीकरण, यासारख्या अनेक किंवा संकुल क्रिया प्रतिक्रियांची गजबज समीक्षेत नेहमीच माजलेली असते. टीका, छाया, अनुवाद, मीमांसा, रसग्रहण, समीक्षण, परीक्षण, परामर्श, अभिप्राय इ. अभिधानांनी समीक्षा ओळखली जाते. तात्त्विक आणि उपयोजित अशा दोन्ही स्तरांवर तिचा संचार असतो.



समीक्षा ही निर्मितीनंतरची एक प्रतिक्रिया असते. एखाद्या कलेची प्रकृती समजून घेण्याचा तो प्रयत्न असतो. समीक्षेत प्रत्येकाने प्रत्येक वेळी नव्याने कलेचा प्रयत्न हा त्या वाङ्मयकृतीची प्रकृती समजून घेण्याचा प्रयत्न असतो. या प्रयत्नातून समीक्षा पुढे सरकत असते. कलेची अथवा वाङ्मयकृतीची निर्मिती ही जशी सातत्याने चाललेली प्रक्रिया आहे तशीच समीक्षा ही कधी न संपणारी वाटचाल आहे. मराठी कादंबरीच्या निर्मितीनंतर आणि तिच्या निर्मितीबरोबर चालणारी समीक्षा ही एक अखंड प्रक्रिया आहे. याचे प्रत्यंतर आपणास कादंबरीचा इतिहास आणि

त्याच्याबरोबरीने चाललेल्या समीक्षेकडे पाहिल्यास लक्षात येते. म्हणूनच कलाकृती आणि समीक्षा किंवा कादंबरी आणि समीक्षा यांचे परस्परावलंबित्व अपरिहार्य आहे.

## ● कादंबरी व समीक्षा यांतील फरक :

मराठी कादंबरीची समीक्षा अगदी प्रारंभीपासूनच तात्त्विक आणि उपयोजित अशा दोन्ही स्तरांवर ठोस आणि सडेतोड झालेली दिसते. प्रारंभीच कथात्मक साहित्याचे स्वरुप मांडताना, तिच्यातील वास्तवाची संकल्पना, कादंबरीतील कल्पित, कादंबरीतील नीती इ. तत्त्वांचा पुरस्कार करणारी ही समीक्षा दिसते. पुढे याच तत्त्वांच्या आधाराने ही समीक्षा व्यापक होत गेलेली दिसते.

कादंबरी हा वाङ्मयप्रकार दीर्घ परीघ असणारा आणि व्यापक अवकाश असणारा वाङ्मयप्रकार आहे. मानवी जीवनाचा विशाल पट कवेत घेणारा व लांबी, रुंदी आणि रुपाच्या मर्यादा न पाठणारा असा हा वाङ्मयप्रकार आहे. साहजिकच या वाङ्मयप्रकाराची समीक्षाही व्यापक व्यामिश्रतेकडे झुकणारी आहे. समीक्षेला केवळ वाङ्मयीन विवेचन आणि कलाकृती यांच्या मागेच जायचे नसते तर त्या वाङ्मयकृती व प्रकारचा सतत शोध घ्यायचा असतो. अर्थात हा सतत शोध म्हणजे त्या वाङ्मयप्रकाराचा इतिहास नव्हे तर शोध म्हणजे स्थल, काळ, अवकाशाच्या पार्श्वभूमीवर त्या वाङ्मयप्रकाराची केलेली तार्किक आणि तात्त्विक मांडणी होय. ही तार्किक आणि तात्त्विक मांडणी करताना समीक्षेला जीवनाच्या अनेकांगांना स्पर्श करावा लागतो. मानवी जीवनातले अनेक विचारप्रवाह, समाज, संस्कृती, इतिहास, मानववंश इ. क्षेत्रातही समीक्षेला आपल्या वाटा धुंडाळाव्या लागतात. कारण कादंबरीमध्ये या सर्व गोष्टींचा समावेश असण्याची शक्यता असते. म्हणूनच कादंबरीची व्यापकता गृहीत धरुन मराठी कादंबरीसमीक्षेलाही आपली दृष्टी व्यापक बनवावी लागते.

मराठी कथात्मक साहित्याची समीक्षाही प्रारंभीपासूनच व्यापकत्वाचा प्रत्यय देणारी आहे. व्यापक समीक्षेबाबत प्रा. गो. मा. पवार म्हणतात. "मराठी कथात्मक साहित्याची समीक्षा ही प्रारंभीपासून जोरकस व लौकिकतावादी आहे. ती रोखठोक, तत्कालीन वास्तवाच्या संकल्पेनचा पुरस्कार करणारी, सौंदर्याच्या जोडीने सत्य व नीती यांचा संबंध प्रतिपादन करणारी आहे. याच्या पुढील शंभरेक वर्षाच्या काळात ही मूळ भूमिका टिकवून ती अधिकाधिक सूक्ष्म, व्यापक व प्रगल्भ होत गेली असल्याचे जाणवते."[२] यावरुन मराठी कादंबरीची प्रवृत्ती प्रारंभीपासूनच कशा प्रकारची आहे, याचा अंदाज येतो.

## ● कादंबरीसमीक्षेतील प्रवृत्ती व प्रवाह :

गेल्या शतकभरातील कादंबरीसमीक्षेकडे स्थूल मानाने पाहिल्यास मराठी कादंबरीसमीक्षेमध्ये विविध प्रवृत्तींचा प्रत्यय येतो. मराठी समीक्षेचा इतिहास पाहिल्यास या प्रवृत्ती अनेकवेळा व्यापक व्यमिश्र बऱ्याचवेळा एकमेकांत गुंतलेल्या आहेत असे दिसते. अभ्यासाच्यादृष्टीने या प्रवृत्तीचे वर्गीकरण स्थूल मानाने तीन प्रकारे करता येईल. या तीन प्रवृत्तींमध्ये पहिली प्रवृत्ती प्रामुख्याने कादंबरीची पायाभूत चर्चा करणारी, कादंबरीचा काल, अवकाश, क्षेत्र - परंपरा यांच्या व्यापक दृष्टीकोनाचे भान ठेवणारी प्रवृत्ती दिसते. कादंबरीसमीक्षेची दुसरी प्रवृत्ती कादंबरीची रचना, तिचे रुपतत्त्व, तिची संरचना, तिच्यातील सत्य-सौंदर्य, तिची कलात्मकता कलेच्या दृष्टीनपे कादंबरी या कृतींच्या स्वायत्तेवर आधारलेली, विविध विचारप्रणालीवर आधारलेली दिसते. तर कादंबरीचा ऐतिहासिक आढावा, कादंबरीची स्फुट समीक्षा, विविध विचारप्रणाली, वाङ्मयीन अभ्यासाच्यादृष्टीने विद्यापीठीय अभ्यासक्रमाची समीक्षा, विशिष्ट लेखक, विशिष्ट प्रकार प्रवाह यांच्या अनुषंगाने विकसित झाले कादंबरीसमीक्षेची तिसरी प्रवृत्ती दिसते. मराठी कादंबरीसमीक्षेला कादंबरी या वाङ्मयप्रकाराप्रमाणेच निश्‍चित सीमारेषा नसल्या तरी समीक्षेविषयी काही ढोबळ आडाखे मात्र करता येतील. या तीन प्रवृत्तींमध्ये -

१. मराठी कादंबरीची सैध्दान्तिक व तात्त्विक विचार मांडणारी प्रवृत्ती
२. रीतीनिष्ठ, रुपवादी, आकतिनिष्ठ, सौंदर्यवादी व संरचनावादी तसेच - काही वाङ्मयीन तत्त्वांच्या आधारे तत्त्वसिध्दान्तांचे उपयोजन करणारी.
३. तंत्र-मंत्रनिष्ठ, स्फुट, विशिष्ट कादंबरी, विशिष्ट कादंबरीकार आणि विद्यापिठीय अभ्यासाच्या आवश्यकतेतून निर्माण झालेली, वाङ्मयीन वाद या अनुषंगाने झालेली समीक्षा प्रवृत्ती.

यापैकी पहिली प्रवृत्ती 'कादंबरी म्हणजे काय?' या प्रश्नाचे उत्तर शोधताना कादंबरीचे काव्यशास्त्र निर्माण करण्याच्या प्रयत्नात असणारी प्रवृत्ती आहे कादंबरीचा एकूण आवाका, काल-अवकाश लक्षात घेऊन तिच्याविषयी भूमिका मांडणारी अशी ही प्रवृत्ती आहे. यात काही तत्त्वे व सैध्दान्तिक भूमिका मांडलेल्या दिसतात. त्यामुळे या समीक्षेला 'सैध्दान्तिक समीक्षा' म्हणता येईल.

कादंबरी कशी आहे, तिची संरचनात्मक व्यूहरचना काय आहे, कादंबरीत काय असावे, म्हणजे तिला कादंबरी म्हणता येईल? 'साहित्यातील सौंदर्य आणि कादंबरी', 'साहित्याचे रुप आणि कादंबरी', 'कादंबरीची घटकचर्चा', 'साहित्यातील कलात्मकता आणि कादंबरीची तत्त्वे, घटक, वाद, संप्रदाय या अंगाने झालेली समीक्षा या दुसऱ्या प्रवृत्तीत आढळते. त्यामुळे या समीक्षेला 'उपयोजित समीक्षा' म्हणता येईल.

कादंबरीसमीक्षेच्या तिसऱ्या प्रवृत्तीमध्ये कादंबरीविषयी स्फुट स्वरुपात नेहमी होणारी चर्चा, यामध्ये विशिष्ट कादंबऱ्या, विशिष्ट कादंबरीकार, वाङ्मयीन वाद आणि वादाच्या अनुषंगाने झालेली समीक्षा, साहित्यातील विविध विचारप्रवाह व या विचार व प्रवाहाच्या अनुषंगाने झालेली कादंबरीचर्चा, विद्यापीठीय अभ्यासक्रम व त्या अभ्यासक्रमाच्या आवश्यकतेनुसार झालेली कादंबरीसमीक्षा यांचा अंतर्भाव करता येईल. उपयोजित समीक्षेचाच हा एक भाग म्हणता येईल.

## ● कादंबरीसमीक्षेची वाटचाल व समीक्षाप्रवृत्ती-प्रवाहांचा अनुबंध :

कादंबरीसमीक्षेमध्ये कादंबरीचा आस्वाद घेताना, तिचे विश्लेषण, मूल्यमापन करताना वेगवेगळे विचारप्रवाह व प्रवृत्ती निर्माण होतात. कादंबरीचा जो विशिष्ट वाचकसमूह असतो त्याची विशिष्ट अभिरुची असते. या विशिष्ट अभिरुचीच्या वाचकसमूहाच्या रेट्यातून विशिष्ट दृष्टिकोन निर्माण होतात व त्या दृष्टिकोनातून एखादी प्रवृत्ती जन्मास येते, या वाचकांमध्ये समीक्षक हा सुध्दा प्राथमिक स्तरावर वाचकच असतो हे ही येथे लक्षात घेतले पाहिजे.

कादंबरीच्या विश्लेषण प्रक्रियेतून मतमतांतरे निर्माण होतात. कादंबरीला कादंबरी ठरविण्यासाठी कादंबरीच्या विश्लेषण प्रक्रियेतून काही निकष निर्माण केले जातात. हे निकष निर्माण करताना जे भेद अथवा विचारप्रवाह निर्माण होतात, त्यातूनच समीक्षच्या विशिष्ट प्रवृत्ती निर्माण होतात. ही मत-मतांतरी, हे भेद का निर्माण होतात. याविषयी वा. ल. कुलकर्णी म्हणतात त्याप्रमाणे ‘साहित्यसमीक्षेमध्ये मतमतांचा गलबला ऐकू येतो. कोणत्याही दोन समीक्षकांचे कोणत्याही प्रश्नांवर एकमत असल्याचे दिसत नाही. या मत-मतांतरामध्येच समीक्षेच्या प्रवृत्तींचा उगम आहे. याची कारणे शोधू पाहता, प्रत्येक समीक्षकाची वा वाचकाची एक विशिष्ट दृष्टी यामागे असते, असे दिसते. आता या दृष्टी कोणत्या, ज्यातून समीक्षेच्या प्रवृत्ती निर्माण होण्याची शक्यता असते. याची चर्चा पुढीलप्रमाणे करता येईल. कादंबरीसमीक्षेचे विविध दृष्टिकोन व त्यातून निर्माण होणाऱ्या कादंबरीसमीक्षेच्या प्रवृत्तींचे विश्लेषण खालीलप्रमाणे -

## ● कादंबरीसमीक्षेचे विविध दृष्टीकोन :

### १. पहिला दृष्टिकोन :

या दृष्टीचे-दृष्टीकोनाचे वाचक -समीक्षक वाङ्मयीन व्यवहाराची जाण असणारे, कादंबरी अथवा कलाकृतीच्या प्रकृतीची-परंपरेची आणि स्थितीगतीची अधिक जाण असणारे, साहित्याचे आकलन, विश्लेषण आणि मूल्यमापन करणारे असतात. यांच्याकडून कलाकृती-अथवा कादंबरीविषयी विशिष्ट पध्दतीने पडताळणी केली जाते. कलाकृती अथवा कादंबरीला तिचे रुप ठरविण्यासाठी एखादाही निकष निर्माण करणारे तिच्या प्रकृतीचे स्वरुप, तिची परंपरा, तिच्याविषयीच्या काही पायाभूत नोंदी आणि तिचा मूलगामी शोध घेणारे हे प्रारंभीचे वाचक असतात. यांनाच समीक्षक म्हटले जाते. कादंबरी अथवा कलाकृतीला कादंबरी ठरविणे अथवा कलाकृती ठरविणे यासाठी हे समीक्षक जे काही निकष अवलंबितात ते निकष सत्यावर आधारलेले, वस्तुनिष्ठ असणारे व त्या वाङ्मयप्रकाराविषयी तात्त्विक व सिध्दान्तवजा मांडणी करणारे असतात. या दृष्टिकोनाच्या समीक्षक - वाचकांनाच सैध्दान्तिक वा तात्त्विक विचार मांडणा-या प्रवृत्तीचे लेखक अथवा समीक्षक म्हणता येईल.

### २. दुसरा दृष्टिकोन :

कादंबरीविषयी दुसरा दृष्टिकोन असणारे वाचक-समीक्षक व त्यांची प्रवृत्ती काय असते? या दृष्टिकोनाचे लेखक-समीक्षक केवळ आस्वादन, आकलन, ऐतिहासिक आढावा, चर्चा, चिकित्सा, तुलना, न्यायदान, प्रतिक्रिया, टीका, मीमांसा, रसग्रहण, समीक्षण, परीक्षण, परामर्श अभिप्राय इत्यादी नावांनी जी समीक्षा ओळखली जाते या दृष्टिकोनातून येथे कलाकृती अथवा कादंबरी शोधतात. या भूमिकेमध्ये कलाकृती अथवा कादंबरीच्या स्वरुपाविषयी कोणतेही तात्त्विक प्रश्न उपस्थित केलेले नसतात. आणखी एक म्हणजे या दृष्टिकोनामागे आस्वादक, कलात्मक आि सौंदर्यवादी दृष्टी असते. रा. नेमाडे हिला ‘रीतीनिष्ठ, रुपवादी, आकतिनिष्ठ, सौंदर्यवादी समीक्षा’ या नावाने संबोधतात. या समीक्षेमध्ये काही वेळा वायफळ वाद व निष्फळ चर्चा होऊन कलाकृतीचे सौंदर्य, कादंबरीतील सौंदर्य, कलेची स्वायत्तता, कलेचे स्वतःचे नियम यावर चर्चा व लिखाण होताना दिसते. यातूनही काही सिध्दांत निर्माण होण्याची शक्यता असते, पण या सिध्दांतांना दीर्घकाळ वाङ्मयीन निकषामध्ये टिकता येत नाही. जीवनातील विशिष्ट एकांगी दृष्टिकोनाच्या तत्त्वावर आधारलेली ही समीक्षा असते. हा दृष्टिकोन स्वीकारणारे वाचक अथवा समीक्षक व्यक्तिगत अभिनिवेशनातून व्यक्तिगत मतांचा, एक दृष्टिकोन निर्माण करताना दिसतात. या समीक्षेमध्ये स्थळ-काल-अवकाश-परंपरा यांचा साकल्याचे विचार यात होत नाही. अशी ही समीक्षेची अथवा वाचकांची ही दुसरी प्रवृत्ती जाणवते.

### ३. तिसरा दृष्टिकोन :

कादंबरीसमीक्षेची तिसरी प्रवृत्ती किंवा तिसरा दृष्टिकोनही आढळतो. हा दृष्टिकोन साधारणतः सक्तीतून, गरजेतून किंवा आवश्यकतेनुसार निर्माण होतो अथवा निर्माण केला जातो. समीक्षा हा एक ज्ञानव्यवहार आहे. हा ज्ञानव्यवहार अभ्यासावर आधारित असतो. हा ज्ञानव्यवहार किंवा अभ्यास बऱ्याच वेळा सातत्याने चाललेला असतो. तो विद्यापीठांमध्ये, महाविद्यालयांमध्ये किंवा संस्थात्मक पातळीवरही चाललेला असतो. या अभ्यासाच्या व ज्ञानव्यवहाराच्या गरतेतून मराठी साहित्यात बरीचशी समीक्षा निर्माण झालेली आहे. महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये अध्ययन-अध्यापनाच्या गरजेतून बऱ्याचवेळा ही कादंबरीसमीक्षा आधाराला घेतली जाते. विद्यापीठीय परीक्षेतील प्रश्न उत्तरांच्या मांडणीतून विशिष्ट प्रकारची समीक्षा उदयास येते. यातून काही समीक्षाग्रंथही या समीक्षेत निर्माण झाले आहेत. बऱ्याच समीक्षकांनी आपला हा उद्देश समीक्षा ग्रंथात स्पष्टही केला आहे. उदा. 'धार आणि काठ' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत नरहर कुरुंदकर म्हणतात, "ते (विद्यार्थी) दर वेळी काहीतरी नवे प्रश्न उपस्थित करीत. प्रश्नांची उत्तरे देणे भाग असे. या चर्चेमध्यून क्रमाने मराठी कादंबरीच्या विकासाविषयी माझी काही मते निश्चित होत गेली. 'मुळात हे पुस्तक म्हणजे एक चाळीसपानी ट्युटोरिअल होते व ते ट्युटोरियल वा. लं. च्या दडपणाखाली लिहिणे भाग पडलेले होते' अशाप्रकारे काही प्रमाणात सक्तीची व गरज म्हणून निर्माण झालेली अशी ही समीक्षा असते, याची कल्पना वरील उदाहरणावरुन येऊ शकेल.

याशिवाय पीएच. डी. या पदवीच्या प्रबंधासाठी निर्माण झालेली कादंबरीसमीक्षाही मराठी कादंबरीसमीक्षेत विपुल प्रमाणात आढळते. विशिष्ट लेखक, विशिष्ट कादंबरी, विशिष्ट प्रवाह-प्रवृत्तीतील कादंबऱ्या, विविध वाङ्मयीन विचारप्रवाह, वाङ्मयीनवाद, चर्चासत्रे, परिसंवाद या अनुषंगाने मराठी कादंबरी समोर ठेवून झालेली समीक्षाही मराठी कादंबरीसमीक्षेत आढळते. अशी ही तिसऱ्या प्रवृत्तीची कादंबरीसमीक्षा मराठी साहित्यात विपुल प्रमाणात आढळते.

- **एकूण मराठी साहित्याची समीक्षा व कादंबरीसमीक्षा :**

कादंबरीसमीक्षेच्या या तीन प्रवृत्ती-प्रवाहांचा शोध घेतल्यानंतर कादंबरीसमीक्षेचे स्वरुप पाहताना एकूण मराठी साहित्याची समीक्षासुध्दा लक्षात घेणे गरजेचे ठरते. एकूण मराठी साहित्याची समीक्षा काय आहे, हे लक्षात घेताना व तिचे स्वरुप पाहताना असे दिसून येते की, मराठी साहित्य आणि त्याची समीक्षा यांचा अनुबंध जवळचा आहे. किंबहुना मराठी साहित्य आणि त्याचीर समीक्षा समांतर आहेत. मराठी भाषा आणि मराठी वाङ्मयाच्या उत्पत्तीपासूनच त्याची समीक्षाही स्वतंत्रपणे अस्तित्त्वात होती, असे दिसून येते. ही समीक्षा व तिचे स्वरुप पुढीलप्रमाणे –

समीक्षेमध्ये साहितयाचे नियमन व नियंत्रण करणारी काही तत्त्वे असतात. त्याचा बरेवाईटपणा पारखणारी स्वतंत्र गमके असतात. साहित्याविषयी व जीवनाविषयी जी काही सर्वमान्य तत्त्वे असतात. त्या तत्त्वांच्या पायावर समीक्षा उभी असते. या तत्त्वांच्या आधारेच समीक्षा लेखकाला साहित्यनिर्मितीच्या संबंधातील सामर्थ्यातील आणि दौबल्याची जाणीव करुन देत असते. साहित्याचे परिशीलन कसे करावे यासंबंधी वाचकाला सूचित करत असते. साहित्याच्या प्रकतीविषयी वाचक आणि समीक्षक यांची जाण वाढवण्याचे काम समीक्षा करते. साहित्यविषयी अभिरुची वाढवणे व साहित्य ही समाजोपयोगी गोष्ट आहे, याची जाणीव वाचकांमध्ये निर्माण करणे, अशी अप्रत्यक्ष कामे समीक्षा करीत असते. समीक्षेच्या मुळाशी समीक्षेची म्हणून काही तत्त्वे असतात. ही तत्त्वे म्हणजेच समीक्षेची मूल्यव्यवस्था होय. या मूल्यव्यवस्थेमागे काही जीवनविषयक धारणा अध्याहृत असतात. समीक्षेतील ही तत्त्वे, मूल्ये, धारणा ह्या जीवनातील विविधांगातून निर्माण होतात. या तत्त्वांना परंपरेचे भान असते. सत्य आणि नैतिकता यांच्या पायावर या धारणा उभ्या असतात. परंपरा आणि जीवनजाणिवा यातून काही सार्वत्रिक निष्कर्ष आणि सिध्दांत निर्माण होतात. हे निष्कर्ष आणि सिध्दांत या समीक्षेमागे असतात. समीक्षेच्या मुळाशी असणारी ही तत्त्वे, निष्कर्ष, मूल्ये, धारणा हे बहुतेक वेळा सार्वत्रिक असतात. काही वेळा ही मूल्ये शाश्वत असतात. काळाबरोबर साहित्य बदलले तरी शाश्वत मूल्ये मात्र बदलत नाहीत. साहित्याची बदलणारी रुपे असतात. ही शाश्वत मूल्ये अचल असतात. परंतु समीक्षेमध्ये काही वेळा या अचल घटकांबरोबरच चल घटकही येतात. हे चल घटक काळाबरोबर आपला प्रभाव निर्माण करतात व त्यानंतर प्रभावहीन होतात. म्हणून साहित्यातले चल घटक कोणते व साहित्याची शाश्वत मूल्ये कोणती यांचा अचूक विचार समीक्षेमध्ये महत्त्वाचा ठरतो.

मराठी समीक्षेमध्येही अशा अचल व शाश्वत मूल्यांची निकषव्यवस्था घेऊन चालत आलेली समीक्षा अगदी प्रारंभीपासूनच दिसते. काळ, अवकाश, परिस्थिती आणि क्षेत्रानुसार समीक्षेतील निकषव्यवस्था बदलली तरी समीक्षेविषयीची काही शाश्वत मूल्ये साहित्यामध्ये प्राचीन काळापासून आहेत. बाईदेव व्यासांच्या 'ग्रंथु निका जाला असे' या अभिप्रायापासून महिपती ताहाराबादकरांनी मोरोपंतांना अध्यात्मिक लावणी करण्यासाठी दिलेला उपदेश, हा येथील निव्वळ मराठी साहित्याच्या तपासणीतून निष्पन्न झालेल्या मूल्यव्यवस्थेचाच एक भाग मराठी साहित्यपरंपरेत दिसतो.

साहित्य ही समाजजीवनातील सत्त्व मुरवून घेणारी अग्रेसर कला आहे. साहजिकच समीक्षा हा सुध्दा साहित्यकलेचाच एक भाग असल्याकारणाने तिथल्या काल, अवकाश, परिस्थिती आणि क्षेत्रातल्या तत्त्वमूल्य-धारणांचे आविष्कारण समीक्षेतून होत असते. हेच

आविष्कारण प्राचीन साहित्यविषयीच्या त्रोटक समीक्षेतून दिसते. ही मूल्ययुक्त, सत्त्वयुक्त, अचल, शाश्वत समीक्षेची मूळची प्रवृत्ती मराठी समीक्षेत प्रारंभीपासूनच होती, आजही काही अंशी आहे.

परंतु आधुनिक कालखंडात भाषांतरयुगानंतर युरोपियन समीक्षेचे आदर्श डोळ्यासमोर ठेवूनच मराठी साहित्यात समीक्षेचेही अनुकरण होऊ लागले. पाश्चात्य साहित्यातील वाङ्मयीन वाद आणि समीक्षामूल्ये मराठी साहित्याला लावण्याचा प्रयत्न सुरु झाला आणि मराठी समीक्षेची 'स्व' च्या पर्यावरणातील सत्त्व घेऊन होणारी समीक्षा होऊ लागली. आधुनिक मराठी साहित्यात निर्माण झालेले अनेक वाङ्मयप्रकार युरोपियन वाङ्मयप्रकारांचेच अनुकरण असल्याचे त्यांच्या तपासणीचे निकषही तिकडील निकषाच्या धर्तीवर काढण्यात येऊ लागले. परिणामतः साहित्यामध्ये काही प्रवृत्ती, काही विचार, काही धारणा आणि आकारबंध पुनःपुन्हा पाश्चात्यांच्या अनुकरणातून येऊ लागल्याने मराठी समीक्षेतही काही तत्त्वांचे पाश्चात्यांचया अनुकरणाने सिध्दान्तन झाल्याचे दिसते. राजकीय आणि सांस्कृतिकतेसह आपण पाश्चात्यांचे सर्वच स्वीकारल्याने साहित्य आणि त्याची समीक्षाही त्याच अनुकरणाच्या धाटणीची झाली आहे. हे आपण नाकारु शकत नाही. त्यामुळे २० व्या शतकाच्या अखेरीपर्यंत तरी पाश्चात्य साहित्यातील संकल्पनांचा आणि सिध्दांन्ताचा प्रभाव मराठी साहित्यावर होता, हे लक्षात आल्याखेरीज राहत नाही.

तरीही मराठी साहित्यात भाषा, प्रांत आणि मूळची संस्कृती यांचे सत्त्व काही अशी का होईना असल्याने कलम झालेल्या पाश्चात्य परंपरेशिवाय इथले सत्त्व टिकवून असलेली परंपरा व या परंपरेच्या अनुषंगाने काही तत्त्वे, काही मूल्ये व काही धारणा यांचे संदर्भ लक्षात घेऊन जी मराठीत समीक्षा होते आहे, ही महत्त्वाची बाब आहे.

आधुनिक मराठी समीक्षेत पाश्चात्य साहित्यसंस्कृतीच्या प्रभावाने जरी समीक्षा निर्माण झाली असली तरी हरिभाऊ, राजवाडे, केतकर, (काही अंशी) कोल्हटकर, कुसुमावती, शरच्चंद्र मुक्तिबोध आणि त्यानंतर रा. नेमाडे हे आणि त्यांच्या प्रभावळीत लेखन, समीक्षण करणारे काही मातब्बर समीक्षक यांची एक परंपरा २० व्या शतकाअखेर मराठी समीक्षेत सातत्याने निर्माण झालेली दिसते.

### १.६ मराठी समीक्षेच्या दोन परंपरा :

| **१) सशक्त परंपरा** | **२) अशक्त परंपरा** |
|---|---|
| अ) सामाजिक संदर्भ | अ) सौंदर्य - कलावादी |
| ब) सामाजिक वास्तव | ब) रुप - घटकतत्त्वावर आधारलेली |
| क) भोवतालचे पर्यावरण | क) पाश्चात्य तत्त्वावर आधारलेली |
| ड) लौकिक जीवनवादी | ड) आस्वादक स्वरुपाची |
| इ) सत्त्वयुक्त परंपरा | |

### १. सशक्त परंपरा :

साहित्य हा जीवनाचा अर्थ आहे आणि समीक्षा ही अशा साहित्याचा अन्वयार्थ आहे. मानवी जीवनाची अनेकांगे खऱ्या साहित्यात प्रकटत असतात. ही अनेकांगी दृष्टिकोन असणारी सामाजिक संदर्भ असणारी अनेकांतवादी समीक्षा; जिच्यात समाज, संस्कृती, परंपरा, सत्य, वास्तव इत्यादी अनेक गोष्टींचा अंतर्भाव आहे. हिलाच पहिली परंपरा म्हणता येईल. जिला भालचंद्र नेमाडे मेटॅसमीक्षा म्हणतात.

### २. मराठी समीक्षेतील अशक्त परंपरा :

समीक्षेच्या पहिल्या प्रवृत्तीचा विचार केल्यानंतर मराठी समीक्षेत दुसऱ्या प्रवृत्तीची समीक्षा काय आहे, याचे उत्तर आधुनिक कालखंडाच्या संदर्भात शोधू पाहिल्यास तात्त्विक व पायाभूत समीक्षेवर आधारलेली. पण बऱ्याच अंशी युरोपियन साहित्याचे आदर्श समोर ठेवून निर्माण झालेल्या समीक्षेचा प्रत्यय येतो. कलावाद, जीवनवाद, स्वच्छतावाद, वास्तववाद, सेंद्रियतत्त्व, लयतत्त्व, कलेची स्वायत्तता, कलेचे आस्वादन, रसग्रहणात्मकता इ. गोष्टींचा अंतर्भाव असणारी ही परंपरा आहे. अशा अनेक वाङ्मयीन पाश्चात्त्य संकल्पना स्वीकारणारी, या संकल्पनांचे नीटसे अर्थ आणि त्यांची निश्चित तात्त्विक मीमांसा नसणारी पण; गेल्या शंभर वर्षामध्ये मराठी समीक्षापरंपरेत आपला दबदबा निर्माण करणारी ही समीक्षा विपुल प्रमाणात आढळते. ही समीक्षा असली तरी एखाद्या साहित्यकृतीचा तिचे निकष लावून निष्कर्षाप्रत गेलेली समीक्षा मात्र क्वचित आढळते. अशा समीक्षेविषयी किशोर सानप म्हणतात, 'परिणामतः मराठीत सैध्दांतिक समीक्षा व उपयोजित समीक्षा असे दोन स्वतंत्र प्रांत निर्माण झाले. मढेकरांचे सौंदर्यशास्त्र, संस्कृतातले रसशास्त्र, नाटयशास्त्र, अरिस्टॉटलचे काव्यशास्त्र, सौंदर्यमीमांसा, वाङ्मयीन वादसंवाद, अशा स्वरुपात मराठीत सैध्दान्तिक समीक्षेची पेरणी करण्यात आली, परंतु ही पेरणी परकीयांच्या भूमीतील बियाणे असल्याने मराठी भूमीत त्यांची वाढ तर झाली नाहीच. उलट कॅक्टससारख्या अत्यंत निरुपयोगी, परंतु देखण्या वनस्पतीसारखे निर्जीव असे समीक्षाशास्त्र त्यातून उपजले. दुसऱ्या बाजूला उपयोजित समीक्षेच्या नावाखाली अत्यंत निरर्थक आणि केवळ बढाया मारणारी वर्तमानपत्री समीक्षा जन्माला आली. त्यात समीक्षकांचे आणि साहित्यिकांचे अड्डे तयार

झाले आणि कुणाला उचलायचे आणि कुणाला पाडायचे यावर आधीच चर्चा होऊन डावपेच आखून समीक्षा लिहिण्याचे तंत्रज्ञान विकसित झाले.'[५] किशोर सानप यांचे विवेचन मराठी समीक्षेच्या बाबतीत पूर्णांशाने सत्य नसले तरी त्यातील अर्धसत्य मराठी समीक्षेबाबत नाकारता येऊ नये, अशी मराठी समीक्षेची परंपरा असल्याचे दिसून येते.

मराठी समीक्षेत या समीक्षेने काही सिध्दान्त मांडण्याचा प्रयत्न केला असला तरी तो पूर्णांशाने यशस्वी झाला असे म्हणता येत नाही. उदा. साहित्याचे सेंद्रियतत्त्व, रुपवाद, लयसिध्दांत असे काही सिध्दांन्त पाश्चात्त्य समीक्षेच्या अनुकरणातून या समीक्षेने स्वीकारल्याचे दिसते. या परंपरेतील मराठीतील मातब्बर समीक्षक खुद्द मढेंकर याविषयी म्हणतात, 'कोठलाही मराठी टिकाकार घ्या, वाङ्मयाचे विवेचन काताना इंग्रजी उताऱ्यांची कास धरल्याशिवाय त्याचे भागत नाही. त्यामुळे जणू काय ते विवेचन विद्वत्तापूर्ण झाले आहे, असे टीकाकारालाच नाही तर वाचकांनाही वाटते! जे टीकाकार प्रत्यक्ष उत्तरे घेत नाहीत, त्यांच्याही टीकाविचारांचा प्रवाह सामान्यतः इंग्रजी टीकाकारांच्या धर्तीवरच वाहतो. स्वतंत्र विचाराने तत्त्वे ठरवून जर मराठी टीकाकार लिहीत असतील तर दुसऱ्या कोणत्याही देशातील वाङ्मय टिकाकारापेक्षा त्यांच्या लेखात इंग्रजी उत्तरे का असावेत? आपल्या टिकाकारांच्या या प्रवृत्तीचा मोठा दुष्परिणाम म्हणजे इंग्रजी टिकाकारांची टिकातत्त्वे म्हणजे जणू काय वेदवाक्ये होऊन बसली आहेत.' 'फक्त इंग्रजी जीवनपध्दती वाङ्मय व भाषा यांच्यावर पोसलेली आमचीर परभृत विचार-भावनासरणी आणि तद्जन्य कल्पनात्मक प्रतिक्रियांचा निर्जीव आवर्तनपणा यांच्यामुळे मराठी वाङ्मयाला बाहेर मान मिळणे दुरापास्त झाले आहे.'[६] याचप्रमाणे मर्ढेकरांच्या मते, ललित कलांच्या टिकाशास्त्रात इंग्रजी टिकाकाराइतके तात्त्विकदृष्ट्या अविश्वसनीय टिकाकार दुसरे कोणी नसते. अशी परभृत, पाश्चात्यांवर भिस्त असणारी अशक्य परंपरेची मोठी समीक्षेची दुसरी प्रवृत्ती २० व्या शतकाच्या अगदी अखेरपर्यंत कार्यरत असल्याची दिसते. आजही मराठीतले अनेक वाद, संकल्पना मराठी समीक्षेत मांडतांना पाश्चात्य समीक्षेचा संदर्भ लक्षात घेतला जातो. मराठी समीक्षेचा पाया बळकट करण्यासाठी पाश्चात्य संदर्भाचे आधार घेतल्याशिवाय ती मांडली जात नाही याचे प्रत्यंतर आल्याशिवाय राहत नाही.

### ● मराठी समीक्षेतील दोन परंपरांची द्विध्रुवात्मकता व कादंबरीसमीक्षा यांचा अन्वय :

कादंबरीसमीक्षेच्या तीन प्रवृत्ती लक्षात घेताना एकूण मराठी समीक्षेच्या या दोन परंपराही आपल्यासमोर असणे महत्त्वाचे ठरते. अशी ही मराठी समीक्षा द्विध्रुवात्मक असल्याचे जाणवते. यापैकी पहिली परंपरा लौकिकतावादाकडे, परंपरेकडे, देशीयतेकडे, जीवनवादाकडे झुकणारी दिसते. तर दुसरी परंपरा अलौकिकतावादाकडे, स्वायत्तताकडे, कलात्मकतेकडे, रचनातत्त्वाकडे, सौंदर्यशोधाकडे व पाश्चात्त्यीय अनुकरणाकडे झुकणारी दिसते. या समीक्षेच्या आधारे मराठी कादंबरीसमीक्षेच्या प्रवृत्तीप्रवाहाचा शोध आणि कादंबरी व कादंबरीसमीक्षेतील अनुबंधाचे संशोधन शक्य आहे.

### ● संदर्भसूची :

०१. गो. म. कुलकर्णी, 'मराठी समीक्षेची वाटचाल', पुणे स्नेहवर्धन प्रकाशन, १९९८, पृ. ६.
०२. गो. मा. पवार / म. द. हातकणंगलेकर (संपा.), 'निवडक मराठी समीक्षा' (प्रस्ता.), साहित्य अकादमी प्रकाशन, १९९९, पृ. २.
०३. उषा हस्तक, 'कादंबरी आणि मराठी कादंबरी', औरंगाबाद, साहित्यसेवा प्रकाशन, १९९३, पृ. ३१.
०४. नरहर कुरुंदकर, 'धार आणि काठ', पुणे, देशमुख आणि कंपनी, १९७१, पृ. ६.
०५. किशोर सानप, 'भालचंद्र नेमाडे यांची समीक्षा', औरंगाबाद, साकेत प्रकाशन, प. आ. २००५, पृ. ७१.
०६. बा. सी. मर्ढेकर, 'सौंदर्य आणि साहित्य', मुंबई मौज प्रकाशन, पाचवी आ. १९९२, पृ. १४२.